सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, घोरपडी, पुणे – ४११००१
ई मेल – admin.dsw@mahasainik.com वेबसाईट – www.mahasainik.com
दूरध्वनी क्रमांक : ०२०-६६२६२६०३/६२

सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात

जाहीरात क्रमांक :- १२०३१/सैकवि-२/निवड समिती -२०१७-१८.

१. सैनिक कल्याण विभाग व विभागाच्या अधिपत्त्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालये व छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथील खालील सरळसेवेची पदे भरण्यासाठी **गट "क"** व **गट "ड"** या पदांकरीता **फक्त माजी सैनिक** उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. **सदर प्रक्रिया ही सध्या रिक्त असलेली पदे व दिनांक ०१ सप्टेंबर २०१७ ते ३१ ऑगस्ट २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त / पदोन्नतीने रिक्त होणा-या पदांकरीता घेण्यात येणार आहेत.** तसेच सदर कालावधीत अपंग संवर्गातील पदे रिक्त होत नसलेने अपंग माजी सैनिकांची अर्ज स्विकारली जाणार नाहीत :-

अ.क्र.	पदनाम	वेतन श्रेणी	रिक्त पदे
अ)	कल्याण संघटक, **गट "क"**	रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० अधिक इतर भत्ते	०८
ब)	वसतीगृह अधीक्षक, **गट "क"**	रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० अधिक इतर भत्ते	०३
क)	कवायत प्रशिक्षक, **गट "क"**	रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - २४०० अधिक इतर भत्ते	०१
ड)	लिपिक टंकलेखक, **गट "क"**	रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० अधिक इतर भत्ते	२१
इ)	वाहन चालक, **गट "क"**	रु. ५२००-२०२००, ग्रेड पे - १९०० अधिक इतर भत्ते	०२
ई)	शिपाई, **गट "ड"**	रु. ४४४०-७४४०, ग्रेड पे - १३०० अधिक इतर भत्ते	०२
उ)	चौकीदार, **गट "ड"**	रु. ४४४०-७४४०, ग्रेड पे - १३०० अधिक इतर भत्ते	०२

२. उपरोक्त नमूद केलेल्या पदांची पात्रता खालील प्रमाणे आहे :-

(अ) **कल्याण संघटक.**

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५०** (**पन्नास**) वर्षांपेक्षा जास्त नाही.

(ii) ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात **सुभेदार दर्जापेक्षा कमी नसेल** अशा पदावर किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली आहे.

(iii) जे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील.

(iv) मराठी/इंग्रजी टंकलेखन जाणणाऱ्यांना पसंतीक्रम राहील.

(ब) **वसतीगृह अधीक्षक .**

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५०** (**पन्नास**) वर्षांपेक्षा जास्त नाही.

(ii) ज्याची सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा झालेली असेल व ज्याने भूदलात **कनिष्ठ राजदिष्ठ अधिकारी म्हणून संरक्षण सेवेत ज्यांनी किमान ५ वर्षे सेवा** केलेली आहे किंवा नाविक दलात अथवा वायुदलात समकक्ष दर्जाच्या पदावर सेवा केलेली आहे.

(iii) माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील.

(क) **कवायत प्रशिक्षक .**

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५०** (**पन्नास**) वर्षांपेक्षा जास्त नाही.

(ii) कनिष्ठ राजदिष्ठ अधिकारी म्हणून संरक्षण सेवेतून सेवानिवृत्त झालेले असतील

(iii) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील.

(iv) सैन्य सेवेतील कवायत प्रशिक्षण प्रमाणपत्र (Drill Qualified Course) धारक असावा.

(ड) **लिपिक टंकलेखक .**

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **४५** (**पंचेचाळीस**) वर्षांपेक्षा जास्त नसेल.

(ii) ज्यानी सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा बजावली असेल.

(iii) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेले असतील.

(iv) मराठी टंकलेखनाचा वेग दर मिनिटास किमान ३० शब्द असल्याचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र त्याच्याजवळ असेल. (**किंवा खाली नमूद केलेल्या परिच्छेद क्र. ३ प्रमाणे**)

(इ) वाहन चालक.

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५० (पन्नास)** वर्षांपेक्षा जास्त नसेल.

(ii) ज्यानी सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा बजावली असेल.

(iii) कोणत्याही शासन मान्यता प्राप्त शाळेचे किमान चौथी उत्तीर्ण झाले आहेत असे.

(iv) मोटार वाहन अधिनियम १९३९ अन्वये मोटार कार किंवा जीप किंवा प्रभावी (effective) अवजड वाहन चालविण्याचे अद्यावत नूतनीकरण केलेला वाहन चालक परवाना (license) असलेले.

(v) मराठी व हिंदी भाषेमध्ये संभाषण करु शकणारे

(vi) मोटार सायकल व्यतिरिक्त मोटार वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असलेले

(vii) यथास्थिती मोटार कार किंवा जीप दुरुस्ती कार्यानुभव असलेले व स्वच्छ नोंद (clean record) असलेले आणि

(viii) सुदृढ व संबंधीत प्रदेशांचे ज्ञान असलेले.

(ई) शिपाई.

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५० (पन्नास)** वर्षांपेक्षा जास्त नसेल.

(ii) ज्यानी सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा बजावली असेल.

(iii) कोणत्याही शासन मान्यता प्राप्त शाळेची कमीत कमी चौथी इयत्ता उत्तीर्ण झालेले आणि मराठी भाषेतून लेखन व संभाषण करुन शकणारे.

(उ) चौकीदार.

(i) दिनांक **०१ ऑक्टोबर २०१७** रोजी ज्याचे वय **५० (पन्नास)** वर्षांपेक्षा जास्त नसेल.

(ii) ज्यानी सशस्त्र दलात १५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी सेवा बजावली असेल.

(iii) कोणत्याही शासन मान्यता प्राप्त शाळेची कमीत कमी चौथी इयत्ता उत्तीर्ण झालेले आणि मराठी भाषेतून लेखन व संभाषण करुन शकणारे.

३. माजी सैनिक उमेदवाराने वरील **परिच्छेद क्रमांक २(ड) (iv)** मध्ये विहित केलेले टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र धारण केलेले नसेल, तर त्याने शासकीय वाणिज्य संस्थेचे विहित टंकलेखन अर्हतेचे प्रमाणपत्र त्याच्या शासन सेवेतील **नियुक्तीच्या दिनांकापासून ११ माहिन्यात** सादर करणे आवश्यक राहील.

४. महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्र. प्रशासन-२०००/प्र.क्र.५/२००१/३२ दि. २०.०७.२००२, प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९ मार्च २००३ व शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभाग, क्रमांक मातंस-२०१२/प्र.क्र. २७७/३९ दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ अन्वये उपरोक्त पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून **दोन वर्षाच्या** आत प्राप्त करणे अनिवार्य राहील.

५. हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

६. शासन अधिसूचना एसआरव्ही.२०००/प्र.क्र.(१७/२०००)/बारा दि. २८ मार्च २००५ मधील तरतुदीनसुार दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवारास हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर या पदासाठी त्यांना अनर्ह ठरविण्यात येईल. तसेच हे नियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसूतीमध्ये जन्मलेले मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या अनर्हतेच्या प्रत्योजनासाठी विचारात घेण्यात येणार नाही. लहान कुटूंब असल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अर्ज करण्याची पध्दत

७. प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahasainik.com या संकेतस्थळावर **दिनांक ०१ सप्टेंबर २०१७ ते ३० सप्टेंबर २०१७** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अर्ज करण्याकरीता सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.com या वेबसाईटवर पहिल्या पानाच्या (Home Page) उजव्या बाजूस **सेवाभरती** यावर क्लीक केल्यानंतर ऑनलाईन अर्ज उपलब्ध होईल. विहित पध्दतीने माहिती सादर करुन अर्ज भरण्याची कार्यवाही **दिनांक ३० सप्टेंबर २०१७ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

८. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना सैनिक कल्याण विभागाच्या www.mahasainik.com या संकेतस्थळावर **सेवाभरती** अंतर्गत (सेवाभरती सूचना) उपलब्ध आहेत. या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

९. **प्रवेशप्रमाणपत्र.** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ०७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र (Hall Ticket) उमेदवाराच्या लॉग-इन आयडीव्दारे विभागाच्या वरील नमूद संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल. यास्तव उमेदवाराने स्वत:चे प्रोफाईलवर लॉग-इन करुन प्रवेशप्रमाणपत्र पहाने आवश्यक आहे. या साठी उमेदवाराशी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. **उमेदवाराने ऑनलाईनव्दारे भरलेले अर्ज (Application Form) व प्रवेशप्रमाणपत्र (Hall Ticket) ची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

१०. <u>उमेदवाराने सोबत आणावयाची कागदपत्रे:-</u>

(अ) लेखी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र, ऑनलाईन प्रणालीव्दारे सादर केलेल्या अर्जाची प्रत, सैन्य सेवेचे डिस्चार्ज पुस्तक, माजी सैनिक ओळखपत्र, पेन्शन पेमेंट ऑर्डर, अवजड वाहन चालविण्याचे अद्यावत नुतनीकरणे केलेला वाहन चालक परवाना, कवायत प्रशिक्षण प्रमाणपत्र व शैक्षणिक अहर्तेची मूळ कागदपत्रे व त्यांची एक छायांकीत प्रत व ०२ पासपोर्ट साईजचे रंगीत फोटो सोबत आणणे अनिवार्य आहे. जर मूळ प्रमाणपत्रे परिक्षेच्यावेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसलेल्या अशा उमेदवारांना लेखी परीक्षा देण्याची अनुमती देण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(ब) परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड, माजी सैनिक ओळखपत्र किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

११. परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात लेखी परीक्षेच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१२. **माजी सैनिकांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेस काही अडचणी आल्यास, त्यांनी आपल्या जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.**

१३. शासन निर्णय क्रमांक प्रानिमं-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३-अ दिनांक २७.०६.२००८ नुसार उपरोक्त परिच्छेद क्रमांक ०१ मध्ये नमूद केलेल्या पदांकरीता जे उमेदवार लेखी परिक्षेस एकूण गुणांच्या किमान **४५ टक्के** गुण प्राप्त करतील अशाच उमेदवारांना गुणवत्ता यादीत समावेश करण्यात येईल.

१४. ऑनलाईन अर्ज अचूक भरण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील. त्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही. अपात्र अर्जदारांना स्वतंत्ररित्या कळविले जाणार नाही. उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१५. उमेदवारांची लेखी परिक्षा सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, रायगड इमारत, राष्ट्रीय युध्दस्मारकासमोर, घोरपडी, पुणे-४११००१ येथे घेण्यात येईल. लेखी परिक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता मुळ कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे, पडताळणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत/त्रुटी आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल.

ठिकाण : पुणे -- ४११००१

दिनांक : 21 ऑगस्ट २०१७

(वि. बा. पाटील)
कमांडर (निवृत्त
उपसंचालक (प्रशासन)
संचालकांकरीता

टिप:-

१. विभागाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

२. प्रमाणपत्र तपासण्याच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.